# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २२.०६.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २१.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये २२ केसेसमध्ये २६ ईसमांवर कारवाई करून ३,०८,३७५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून ७८,५५०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,३३६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ९२,४००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०४ पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २२.०६.२०२६ चे ००.२० वा. ते ०१.५५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट ०४ चे अधिकारी व अंमलदार हे **अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम** राबवितांना पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, वाठोडा ले—आऊट, पांधन रोड, एनएमसी मैदानाजवळ एक संशयीत ईसम दिसल्याने, त्यास थांबवुन, पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रिजवान शेख, शकील शेख, वय २४ वर्षे रा. हसनबाग, कब्रस्तान जवळ, तीसरी गल्ली, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. संशयीतांजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण ११ ग्रॅम एम.डी. पावडर किंमती अंदाजे १,१०,०००/— रू. ची मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन रोख ६,२००/—रू., एम.डी. पावडर, ०१ मोबाईल, असा एकुण १,२६,२००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी त्याचा साथिदार पाहिजे आरोपी सोहेब उर्फ उर्फ सोबू वय २५ वर्षे, रा. हसनबाग, नागपुर याचे मदतीने आणल्याचे सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. आरोपीला

मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि.बाबुराव राऊत, सपोनि वैभव वारंगे, पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली, पोहवा. अतुल चाटे,सतीश ठाकरे, अभिषेक शनिवारे, पुरूषोत्तम जगनाडे, पोअं. गंगेश्वर सुवासार यांनी केली.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतून मानवी तस्करी व व्यवसायीक लैंगीक शोषणाची जाळी उखडून टाकण्याच्या उद्देशाने नागपूर शहरात सुरू असलेल्या **''ऑपरेशन शक्ती अंतर्गत''** दिनांक २१. ०६.२०२६ चे १७.२५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र.०१ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत, प्रयाग एनक्लेव, मे—फेअर लक्झरी नावाचा स्पा, बजाजनगर चौक, येथे रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी अमन नामदेवराव वैद्य, वय २८ वर्षे, रा. आकार बिल्डींग, बैरामजी टाऊन, सदर, नागपूर हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करून, पिडीत महीलांकडुन देहव्यावसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन ०४ पिडीत महीलांची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख ४,८००/—रू., ०३ मोबाईल फोन व ईतर साहित्य असा एकुण किंमती ८४,८३०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा त्याचे साथीदार पाहिजे आरोपी १) सुशिलकुमार लोहारीवाल २) कमलकुमार गोसावी दोन्ही रा. राऊलकेला, उडिसा यांचे मदतीने देहव्यापार करीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे बजाजनगर येथे कलम १४३(२), भा.न्या.सं., सहकलम ३, ४, ५, ७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव बजाजनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) मा. श्री. मा. दिपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, व त्यांचे पथकाने केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी:— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २२.०६.२०२६ चे ०२.०२ वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, भिमनगर, चर्चसमोर मोकळ्या मैदानात एक इसम हातात शस्त्र घेवुन, येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून धुमधाम करीत आहे. अशा माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसल्याने, त्यास घेराव टाकून ताब्यात घेवुन, निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव शक्ती लालजी विश्वकर्मा, वय ३१ वर्षे रा. न्यु दादाजीनगर, प्लॉट नं. ७, जयताळा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने कोयता बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. राजेश वरठी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे सपोनि. संजय बनसोड यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का. , सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे तहसील :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १९.०६.२०२६ चे १३.०० वा. ते २१.०६.२०२६ चे ०१.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे तहसील हद्दीत, बोरीयापुरा, नदीम क्लॉथ स्टोअर्स जवळ, तहसील, नागपुर येथे राहणारे फिर्यादी शेख राशीद शेख अजीज वय ३८ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून कामानिमित्य बाहेरगावी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे पहिल्या माळ्यावरील मुख्य दाराचे कुलूप तोडून आंत प्रवेश करून, कपाटामधील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,१२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे संजय माने ८९९९०५८५४४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कळमना :—** दिनांक २१.०६.२०२६ चे ०७.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, भरत नगर, भरतवाडा रोड, सरजा बार जवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. ज्ञानेश्वर मोरे ९९७०३५०४६७ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**